# 'वक्तृत्व विकासासाठी स्पीकर्स फोरमच्या आयोजनाची गरज'

**मांजरी, दि. १८ (प्रतिनिधी)-सुसंवाद साधणे ही एक कला असून, वक्तृत्व विकासासाठी हा पहिला व महत्त्वाचा टप्पा आहे. त्यासाठी प्रत्येक महाविद्यालयात 'स्पीकर्स फोरम'सारखे उपक्रम राबवून विद्यार्थ्यांची जीवनशैली सुधारण्याचा प्रयत्न केला पाहिजे, असे प्रतिपादन प्रा. श्याम भुर्के यांनी व्यक्त केले.**

हडपसर (महादेवनगर) येथील अण्णासाहेब आवटे अभियांत्रिकी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांमध्ये वक्तृत्वकलेचा विकास व्हावा यासाठी 'स्पीकर्स फोरम' या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. याचे उद्‌घाटन प्रा. श्याम भुर्के यांच्या हस्ते झाले. त्यावेळी अभियांत्रिकीच्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना ते बोलत होते, विद्यालयाचे प्राचार्य डॉ. के. आर. हरणे हे कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी होते.

आपले वक्तृत्व ही पहिली ओळख असल्याचे सांगून प्रा. भुर्के पुढे बोलताना म्हणाले की, नोकरीसाठी मुलाखत देताना सुसंवाद साधणे महत्त्वाचे असते.

यावेळी समोरच्या व्यक्तीशी आपण कसा संवाद साधतो, यावर अनेक गोष्टी अवलंबून असतात. समाजामध्ये वावरताना, समाजासमोर व्यक्त होताना जाणीवपूर्वक काही सवयी अंगीकारणे आवश्यक असते. अभियांत्रिकीचे विद्यार्थी वक्तृत्वाकडे दुर्लक्ष करतात.

त्याचा तोटा विद्यार्थ्यांना झाल्याची उदाहरणे आहेत. या ठिकाणी दर महिन्याला दोन वक्त्यांचे विद्यार्थ्यांना मार्गदर्शना मार्गदर्शन दिले जाणार असल्याचे प्राचार्य डॉ. के. आर. हरणे यांनी सांगितले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक 'स्पीकर्स फोरम'चे प्रमुख प्रा. विजय नवले यांनी केले. सूत्रसंचालन शशी ठाकूर यांनी तर रुपा सक्सेना यांनी आभार प्रदर्शन केले. महेश घुले यांनी संयोजन केले.

प्रभात १९ मार्च ०८

# वक्तृत्व विकासासाठी 'स्पीकर्स फोरम'

## आवटे महाविद्यालय : प्रत्येक महिन्याला विद्यार्थ्यांसाठी विशेष कार्यक्रम

**मांजरी, ता. १६ :** "सुसंवाद साधणे ही एक कला असून, गुणसंपन्न व्यक्तिमत्त्वासाठी हा पहिला व महत्त्वाचा टप्पा आहे. त्यासाठी प्रत्येक महाविद्यालयात 'स्पीकर्स फोरम'सारखे उपक्रम राबवून विद्यार्थ्यांची जीवनशैली सुधारण्याचा प्रयत्न केला पाहिजे," असे मत प्रा. श्याम भुर्के यांनी व्यक्त केले.

अभियांत्रिकीच्या विद्यार्थ्यांमध्ये वर्क्तृत्व कलेचा विकास व्हावा यासाठी हडपसर येथील अण्णासाहेब आवटे अभियांत्रिकी महाविद्यालयात 'स्पीकर्स फोरम' उपक्रम सुरू करण्यात आला आहे. त्याचे उद्‌घाटन प्रा. भुर्के यांच्या हस्ते झाले. त्या वेळी मार्गदर्शन करताना ते बोलत होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. के. आर. हरणे होते. फोरमचे प्रमुख प्रा. विजय नवले यांनी प्रास्ताविक केले.

प्रा. भुर्के म्हणाले, "आपले वर्क्तृत्व ही पहिली ओळख असते. नोकरीसाठी मुलाखत देताना या गोष्टीचा प्रभाव महत्त्वाचा असतो. समोरच्या व्यक्तीशी आपण कसा संवाद साधतो, यावर अनेक गोष्टी अवलंबून असतात. समाजामध्ये वावरताना, समाजासमोर व्यक्त होताना जाणीवपूर्वक काही सवयी अंगीकारणे आवश्यक असते."

"अभियांत्रिकेचे विद्यार्थी वक्तृत्वाकडे दुर्लक्ष करतात. त्याचा तोटा विद्यार्थ्यांना झाल्याची उदाहरणे आहेत. दर महिन्याला दोन वक्त्यांचे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन दिले जाणार आहे," अशी माहिती प्राचार्य डॉ. के. आर. हरणे यांनी दिली. शशी ठाकूर यांनी सूत्रसंचालन केले. महेश घुले यांनी संयोजन केले, तर रूपा सक्सेना यांनी आभार मानले.